## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आलोसे क्र.०१**:—श्री.सचिन शंकरलाल जैस्वाल, वय ४३ वर्ष,पद —तहसिलदार, वर्ग—१,तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा जि.बुलढाणा<br>**आलोसे क्र.०२**:—श्री.मंगेश शालीग्राम कुलथे,वय ४० वर्ष,पद—चालक,वर्ग—३, तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा जि.बुलढाणा<br>**आलोसे क्र.०३**:—श्री.पंजाबराव तेजराव ताठे,वय ५५ वर्ष,पद—शिपाई,वर्ग—४, तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा जि.बुलढाणा |
| लाच मागणी | ३५,०००/— रुपये |
| लाच स्विकारली | ३५,०००/— रुपये |
| घटनास्थळ | तहसिल कार्यालयाचे परिसरातील, उपकोषागार कार्यालयासमोर,सिंदखेडराजा |
| घटना तारीख | १२.०४.२०२४ |

**थोडक्यात हकीकत** :—यातील तक्रारदार यांचा वाळु वाहतुकीचा व्यवसाय असुन वाळुचा लिलाव झालेला असल्यास ते कायदेशीर परवाना घेवुन वाळु वाहतुक करतात. परंतु सध्या वाळु वाहतुकीचा लिलाव झालेला नुसन अवैधरित्या वाळु वाहतुक सुरु आहे. तक्रारदार यांना ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळु वाहतुक सुरु करण्यासाठी यातील आरोपी क्र. २ मंगेश कुलथे यांचेकडुन आरोपी लोकसेवक श्री. सचिन जैस्वाल तहसीलदार सिंदखेडराजा यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे एका ट्रॅक्टरसाठी प्रतिमहीना ३५०००/— रुपये लाचेची मागणी होत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार आज दिनांक १२.०४.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक क्रमांक २ श्री.मंगेश शालीग्राम कुलथे, पद चालक, नेमणुक तहसील कार्यालय, सिंदखेडराजा यांनी तक्रारदार यांचेकडे आलोसे क्र.०१ श्री.सचिन जैस्वाल,तहसिलदार,सिंदखेडराजा यांचेकरिता ३५,०००/—रुपये लाच मागणी करुन सदर लाच देण्यासाठी यातील आरोपी क्र.३ श्री. पंजाबराव तेजराव ताठे पद—शिपाई नेमणुक तहसील कार्यालय,सिंदखेडराजा यांनी प्रोत्साहन देवुन आरोपी आलोसे क्र.१श्री.सचिन शंकरलाल जैस्वाल पद—तहसिलदार,सिंदखेडराजा यांनी सदर लाच रक्कम स्वीकारण्यास संमती देवुन सदर लाच रक्कम आलोसे क्र.२ श्री.मंगेश कुलथे यांचेकडे आजच देण्यास सांगीतले. त्यावरून आलोसे क्र.२ मंगेश कुलथे यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन बोलावल्याने आज दिनांक १२.०४.२०२४ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता. आलोसे क्रमांक २ श्री. मंगेश कुलथे यांना तक्रारदार यांचेकडुन ३५,०००/— रुपये लाच रक्कम स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. वरील तिनही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सिंदखेडराजा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सापळा कार्यवाही नंतर आलोसे क्र.०१ श्री.सचिन जैस्वाल,तहसिलदार यांना ताब्यात घेवून त्यांची राहते शासकीय निवासस्थानाची पंचासमक्ष घरझडती घेतली असता घरझडती दरम्यान लोकसेवक श्री. सचिन जैस्वाल, तहसिलदार यांचे निवासस्थानामध्ये एकूण **३७,५२,१८०/—(अक्षरी — सदोतीस लाख बावन्न हजार एकशे ऐंशी )** रूपये रोख रक्कम मिळून आले आहे तसेच लोकसेवक श्री.सचिन जैस्वाल,तहसिलदार यांचे परभणी येथील राहते घराची ॲन्टी करप्शन ब्युरो,परभणी ,घटकाने घरझडती घेतली असता सदर घरामध्ये **९,४०,०००/— (अक्षरी— नऊ लाख चाळीस हजार)** रूपये रोख रक्कम मिळून आले आहे. सदर रक्कमा जप्त करण्यात आल्या आहेत. त्याच्याकडील इतर मालमत्तांचा शोध सुरू आहे.

Scanned with CamScanner

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.अनिल पवार,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती

३.श्रीमती शितल घोगरे,पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

४.श्री.गजानन शेळके,पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,वाशिम

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, सापळा मदत पथक श्री. गजानन शेळके,पोलीस उपअधिक्षक,लाप्रवि वाशिम,पोलीस निरीक्षक, महेश भोसले,एएसआय/शाम भांगे, पोहेकॉ/प्रविण बैरागी, पोना/विनोद लोखंडे, जगदीश पवार,पोकॉ रंजित व्यवहारे, मपोकॉ/स्वाती वाणी, चानापोकॉ/नितीन शेटे,पोकॉ मधुकर रगड,अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा तसेच लाप्रवि वाशिम येथील पोहेकॉ नितिन टवलारकर,विनोद अवगळे, पोना योगेश खोटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(सचिन इंगळे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

कार्यालय पोलीस उप अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
बुलडाणा

Scanned with CamScanner